


# माहितो

**सर्व मराठीसाठी, मराठी सर्वांसाठी !**

अंक २,  अश्विन शु. तृतीया, शके १९३९.

सप्टेंबर २०१७.

मराठी वाङ्मय मंडळ

डी. जी. रुपारेल महाविद्यालय

## मार्गदर्शक मंडळ

डॉ. तुषार देसाई (प्राचार्य)

प्रा. वैशाली जावळेकर (मराठी-विभागप्रमुख)

डॉ. अनघा मांडवकर (मराठी विभाग)

## तांत्रिक साहाय्य

प्रा. मंदार भावे

(संगणकविज्ञान-विभागप्रमुख)

## संपादकीय मंडळ

| | |
|---|---|
| अक्षता सावंत | रुतिका कांबळे |
| ईशा विद्वांस | वेदांगी नारकर |
| ज्योत्स्ना भाटवडेकर | सानिका आठवले |
| तेजल भट्टे | सावनी गोगटे |
| मोहम्मद अकबर  शिकलगार | सोनाली जाधव |

## मुखपृष्ठ आणि अन्य सजावट

हर्षल महाडिक    समीक्षा दबडे    आरती ढोले

## संपादकीय

मराठीच्या उज्ज्वल भवितव्यासाठी आणि मराठी भाषा, साहित्य, संस्कृती ह्यांच्या जतन-संवर्धनासाठी प्रयत्न केले गेले पाहिजेत; आणि ते सर्वच स्तरांवर केले गेले पाहिजेत, ही ‘सहितौ’ ह्या नियतकालिकाची भूमिका आहे. ‘सहितौ’ ह्या नियतकालिकाचा दुसरा अंक प्रकाशित करताना आम्हाला आनंद होत आहे. मराठीतील ज्ञानपीठ-सन्मानित साहित्यिक गो. वि. करंदीकर, ऊर्फ विंदा करंदीकर ह्यांचे जन्मशताब्दी -वर्ष ऑगस्ट २०१७ पासून सुरू झाले आहे. दिनांक २ सप्टेंबर २०१७ रोजी, मराठी साहित्यात ‘हायकू’ हा काव्यप्रकार रुजविणाऱ्या ज्येष्ठ साहित्यिक शिरीष पै ह्यांचे निधन झाले. ह्या दोन्ही साहित्यिकांस ‘सहितौ’ ह्या नियतकालिकातर्फे विनम्र अभिवादन !

विंदा करंदीकर ह्यांच्या जन्मशताब्दी-वर्षानिमित्त दिवाळीनंतरच्या शैक्षणिक सत्रात विशेषांक काढण्याचा मानस आहे. त्यासाठी विंदा करंदीकर ह्यांच्या साहित्याविषयी आपले लेखन आमच्यापर्यंत पोहोचवावे, हे आवाहन करीत आहोत. आपले लेखन तसेच ‘सहितौ’ ह्या नियतकालिकाबाबतच्या आपले प्रतिसाद ‘सहितौ’च्या sahitau.marathi@ruparel.edu ह्या ई-पत्त्यावर पाठवावे.

# अनुक्रमणिका


साद-प्रतिसाद ४

संचिताचे कवडसे (महदंबेचे धवळे) ५ - ६

- मायबोली (आगरी) ७
- धूळपाटी ८ - २५

⇒ कविता ८ - १९

⇒ कथा २० - २५

- वाचू आनंदे (बदल हेच शाश्वत सत्य) २६ - २७
- तुम्हाला हे माहीत आहे का ? २८
- खेळातून मराठीकडे … २९
- शब्द शब्द जपुनी ठेव ३०
- थोडेसे चिवित्र ३१
- मराठी-वाङ्मय-मंडळाचे उपक्रम : ३२ - ३३

## साद

‘सहितौ’ ह्या नियतकालिकाला आपल्याकडून विविध प्रकारचे लेखन, तसेच प्रतिसाद हवे आहेत. कृपया आपले लेखन आणि प्रतिसाद sahitau.marathi@ruparel.edu ह्या ई-पत्त्यावर पाठवावे. ज्ञानपीठ-पुरस्कारविजेते साहित्यिक गो. वि. करंदीकर, ऊर्फ विंदा करंदीकर ह्यांच्या जन्मशताब्दीवर्षानिमित्त दिवाळीनंतरच्या शैक्षणिक सत्रात ‘सहितौ’चा विंदा करंदीकर विशेषांक प्रकाशित करण्याचा मानस आहे. रुपारेलमधील प्राध्यापक, विद्यार्थी आणि शिक्षकेतर कर्मचारी ह्यांना विनम्र आवाहन आहे की, ह्या विशेषांकाकरिता विंदा करंदीकरांच्या साहित्याविषयी आपले लेखन पाठवावे.

## प्रतिसाद

प्रेषक : आरती जोशी (**artijoshi20865** <artijoshi20865@gmail.com>)
‘सहितौ’ अतिशय सुंदर नियतकालिक आहे. ह्यातील कविता आणि लीळा छान आहेत. अशाच छान लेख आणि कविता वाचायला देत राहा.

# संचिताचे कवडसे

(मराठी भाषेला मध्ययुगापासून गद्य-पद्य साहित्याची संपन्न परंपरा लाभली आहे. नव्या पिढीला तिचा परिचय करून देण्याच्या उद्देशाने विविध कालखंडांतील मराठी साहित्यसंचितातील काही अंश ह्या सदरात समाविष्ट करण्यात येणार आहेत. ह्या अंकात महदंबा-लिखित 'धवळे' ह्या साहित्यकृतीचा परिचय करून देत आहोत.)

## महदंबेचे धवळे

तेराव्या शतकाच्या उत्तरार्धात स्थापन झालेल्या महानुभाव संप्रदायाने वाङ्मयातील विविधता, उत्कटता, भक्तिनिष्ठा, ज्ञाननिष्ठा आणि ह्या सर्वांना सामावून घेणारी पंथनिष्ठा ह्यांच्या माध्यमातून मराठी वाङ्मयाचे दालन समृद्ध केले. मराठी साहित्यातील आद्य कवयित्री महदंबा (मूळ नाव 'रुपाई') ही महानुभाव संप्रदायाचे संस्थापक चक्रधरस्वामी ह्यांची पट्टशिष्या होती. श्रीकृष्ण-रुक्मिणी-विवाहप्रसंगाचे वर्णन करणारी ही गीते गोविंदप्रभूंनी आज्ञा दिल्यावर महदंबेने रचली. 'धवळे' हे मूलतः 'धवलगीत' होय. देव वा देवतुल्य महापुरुषांच्या पराक्रमाचे, कीर्तीचे गुणगायन करण्यासाठी धवलगीत हा काव्यप्रकार अस्तित्वात आला. धवळे म्हणजे ओवीबंधातून 'रुक्मिणीस्वयंवरा'च्या कथेचे केलेले उत्स्फूर्त कथागायन होय. धवळयांतून महदंबेच्या कथानिवेदनाचे आणि काव्यानिर्मितीचे पुरेपूर सामर्थ्य प्रत्ययास येते.

धवळयांचा पूर्वार्ध ज्ञानेश्वर-पूर्वकाळात आणि उत्तरार्ध शके १२३४ पूर्वी लिहिला गेला. मध्ययुगीन मराठी साहित्यात 'रुक्मिणीस्वयंवर' कथेचे एक नवे दालन प्रथम महदंबेने उभे केले. महदंबेने 'रुक्मिणीस्वयंवरा'च्या कथानकाचे धवळयांत असे काही रूपांतर केले की, 'रुक्मिणी स्वयंवर' ही पूर्णतः मराठमोळी स्वयंवरकथा होऊन गेली. धवळयांतील एक प्रसंग उदाहरणादाखल पाहूया :



रुक्मिणीस श्रीकृष्णाचे प्रथम दर्शन घडले, तेव्हा तो तिला कसा दिसला, ह्याचे रेखीव चित्रण खालील धवळयात येते.

भद्री-सौधावर श्रीकृष्णयात्रा पाहत उभ्या असलेल्या रुक्मिणीचे लक्ष सुदैवानेच श्रीकृष्णाकडे प्रथम वेधले गेले, असे सांगून महदंबा म्हणते,

''पालव छत्रा श्रीगीरी नाहीं तेथें अंतु :
हीरे विस्फुरीतु गरुडध्वज रथु :
तेथे पाहे कृष्णरावो कंठी कौस्तुभ हरीत रवीचे तेज :
चवरे सहस्त्र दळाती झळझळे पीतांबरू देवी हा पती तुझा : ॥३४॥

लावण्यासागरू कृष्ण देखिला झळकतां :
आकर्षिलें तव तिएचे चित्त :
कैसी संभ्रमीत जाली माडा वरोनियां घालूं पाहे उडी :
वीप्रे सवरली बाळी म्हणे देवी नव्हे तुमचे उचित : ॥३५॥"

श्रीकृष्णाचे वैभव हे नेत्रदीपकच होते; पण त्याहून अधिक महत्त्वाचे होते ते त्याचे अद्भुत पराक्रमाने विश्वविख्यात झालेले लावण्य, त्याचे चित्तवेधी सौंदर्य. त्याने रुक्मिणीचे चित्त असे काही वेधले की, त्याक्षणीच रुक्मिणी माडीवरून त्याच्याकडे झेपावू पाहते. सुदेव तिला वेळीच सावरतो. पुढे स्वयंप्रेरणेने उत्तम पक्वान्ने सिद्ध करून रुक्मिणी गुप्तपणे श्रीकृष्णास रुखवत पाठवते. तेव्हा 'उचीतां न चुकेचि' म्हणून श्रीकृष्ण त्याचा सन्मानपूर्वक स्वीकार करतो आणि उद्धवदेवाच्या खांद्यावर हात ठेवून पांडव, यादवांसह आरोगणासाठी (म्हणजेच भोजनासाठी) निघतो.

धवळ्यांतून लोकसाहित्याचे चैतन्य, लोकजीवनाचे रंग आणि स्त्रीमनाचा उत्स्फूर्त वाङ्मयीन आविष्कार व्यक्त झाला आहे. महदंबेने प्रथमच 'ओवी' ह्या छंदास कौटुंबिक जीवन ह्या विषयक्षेत्राची मर्यादा ओलांडून श्रीकृष्णचरित्र-सन्मुख केले. महदंबेचे धवळे ही ह्या दृष्टीने लगतच्या भविष्यात विकसित झालेल्या मराठीतील संपन्न आख्यानकाव्य-परंपरेची व ती समर्थपणे पेलणाऱ्या ग्रांथिक ओवी-छंदाची गंगोत्रीच म्हणावी लागेल.

**अक्षता सावंत.**

तृतीयवर्ष (कला)

संदर्भ - इर्लेकर सुहासिनी;१९७७ (ति.आ.) : *महदंबेचे धवळे*; पुणे : स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस.

# मायबोली
## आगरी

(नदीच्या प्रवाहाला अनेकानेक झरे जसे जिवंत ठेवतात, समृद्ध करतात; त्याप्रमाणे विविध बोलींचे प्रवाह भाषेचे ऐश्वर्य वाढवतात. प्रमाण मराठीविषयीच्या क्षमता आत्मसात करण्याच्या जोडीने मराठीच्या बोलींविषयीही माहिती करून घेणे आवश्यक आहे, ह्या भूमिकेतून ह्या सदराच्या माध्यमातून एकेका बोलीचा थोडक्यात परिचय करून देण्याचा मानस आहे. ह्या वेळी 'आगरी' ह्या बोलीविषयीची माहिती आणि ह्या बोलीतील एक लोकगीत ह्यांचा परिचय करून घेऊ या.)

**बोली :**

आगरात राहणाऱ्यांना 'आगरी' असे म्हणतात. आगर (नारळी, पोफळी, भाजीपाला, भात, मीठ वगैरे पिकवण्याचे ठिकाण) पिकवणारा तो आगरी समाज होय. ह्या समाजाची बोली ती आगरी बोली होय.

**भौगोलिक प्रदेश :**

आगरी या समाजाची मूळ वस्ती साधारणतः ठाणे, मुंबई, नवी मुंबई, रायगड व नाशिक ह्या जिल्ह्यांत / भागांत आढळते.

**साहित्य :**

मराठी साहित्यात ह्या बोलीला १९६० नंतरच लिखित स्वरूप मिळाले असून, ही बोली १९७० नंतर शंकर सखाराम ह्यांच्या साहित्यकृतींत योजिली गेलेली दिसते.

**लोकगीत :**

| आगरी | मराठी |
|---|---|
| हाती घतल्या बाय कुदली<br>घेतल्या बाय पड्या<br>देव गेलं माळ्याच्या काय मल्या.<br>काय बाय हलदी खनू - खानिल्या बाय हलदी<br>भरल्या बाय पड्या<br>पड्या काय न्हेल्या - गंगेच्या तिरी धुयाला<br>हलदी धुईल्या चोलील्या<br>गायगोमुतरी उकलिल्या<br>सूर्याचे किरनी वालईल्या. | हातात कुदळी घेतल्या<br>परड्या घेतल्या<br>देव मळ्याच्या मळ्यात गेले.<br>हळद खणू या - हळद खणली<br>परड्या भरल्या<br>परड्या नेल्या गंगेच्या तीरी धुवायला.<br>हळद धुतली चोळली<br>गोमूत्रात उकळली<br>सूर्याच्या किरणात वाळविली. |

संकलन - **समीक्षा दबडे,** तृतीयवर्ष (कला)

संदर्भ - जाखडे, अरुण (संपा.), देवी, गणेश (प्रकल्प-संपादक); २०१३ : *भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण – महाराष्ट्र*, पुणे : पद्मगंधा प्रकाशन.

# धूळपाटी


(पूर्वीच्या काळी मुले धूळपाटीवर अक्षरे गिरवायची. ह्या सदरात समाविष्ट केलेले विद्यार्थ्यांचे लेखनाचे चुकतेमाकते प्रयत्न म्हणजे जणू सर्जनशीलतेच्या धूळपाटीवर त्यांच्याकडून गिरवली जात असलेली धुळाक्षरेच होत, असे म्हणता येईल. )

## कविता :

२०१६-२०१७ ह्या शैक्षणिक वर्षात मराठी विभागातर्फे आयोजित केलेल्या स्वरचित काव्यस्पर्धेतील पारितोषिक-विजेत्या विद्यार्थ्यांच्या कविता ह्या सदरात समाविष्ट करीत आहोत. ह्या स्पर्धेच्या परीक्षक प्रा. माधवी राव (मराठी विभाग, कनिष्ठ महाविद्यालय) ह्यांचे आभार आणि सर्व पारितोषिक-विजेत्यांचे मनःपूर्वक अभिनंदन !

***प्रथम क्रमांक :***

### शिळा



एक बाई चढली चौथऱ्यावर
अन् नासवली जागा तिने,
'पुरुषी' श्रद्धेवर तरंगणारा धर्म बुडवला,
इतकी वर्षे संरक्षण करणाऱ्या
शनीच्या कड्याचाच कडेलोट केला तिने;
सगळे पुजारी, सनातनी आणि बडवे
धावून गेले तिच्यावर,
अन् चिलटाला उचलून फेकावं तसं
चिमटीत धरून दूर भिरकावून दिलं
अज्ञात काळासाठी.

आता कडं अधिक आवळण्यात आलंय,
बाईची सावलीसुद्धा पडत नाही तिथं;
मंदिरातल्या साखरेला लागलेल्या
'मादी' मुंग्या आल्या पावली परत गेल्या,
कळसावर प्रणयात मग्न असलेली
'कावळी' भुर्रकन उडून गेली.
देवळातल्या 'गाई-म्हशीं'चा पान्हा आटला,

स्त्रीबीजच आटल्याने त्या परिसरात
ना कधी फूल फुललं, ना मूल जन्मलं
सगळा परिसर ओकाबोका, ओसाड......

एके दिवशी मोठा भूकंप झाला,
साऱ्या परिसराला भूमीने सामावून घेतलं,
फक्त मंदिर तेवढं शाबूत राहिलं ...
कारण भूमी म्हणजे ‘माता’, म्हणजे ‘बाई’,
तिनेही अंग काढून घेतलं,
हा देवाचाच चमत्कार (!)
मंदिर पुन्हा (पुरुष) भाविकांनी तुडुंब भरलं,
मंदिरातली काळीकभिन्न शिळा मात्र
तशीच उभी होती तटस्थपणे -
एखाद्या ध्यानस्थ (ब्रम्हचारी) पुरुषासारखी !

कालही आणि आजही (आणि उद्याही) ...

**ओंकार शिरसकर**
बारावी (विज्ञान)

***द्वितीय क्रमांक :***

## स्मार्ट शिटी

औंदा गावात काय म्हाईत भलतंच वारं शिरलंय ...
तरनंताठं प्वार म्हने गावात शिट्टी मारत फिरलंय ...

पाटलाचा थेरडा ल्योक आता मोठा मानूस जालाय ...
दिल्लीतून गावासाटी इयाक स्कीम घेवून आलाय ...

गाव आता हुनार म्हने तालुक्याहून मोटं ...
मला वाटतं आंगापेक्षा ह्यांचं पांघरून छोटं ...

विहिरी जाऊन गावामदे बडे पायीप येनार ...
घरामदल्या नळाला तरी येकच तास पानी येनार ...

हेक्ट्राची शेती जाऊन रस्ता हूनार लांब ...
जागोजागी बसवनार इलेक्ट्रिकचे खांब ...

कर्ज घेऊन घेतलेले पान्याचे पंप ...
रस्त्यामुळे हूनार त्यांचा कायमचा संप ...

बरं, समजा दिली येवडी जिमीन त्याचं पैसे कवा गावनार ...
का येवडा मोटा आकडा फक्त कागदावरच मावनार ...

पाटलाचं प्वार म्हंजी बिगडलेलं कारटं ...
जागोजागी वायफाय लावून गाव करनार स्मार्ट ...

कालपरवाला दुपारच्याला गम्मत जाली फार ...
खडी चेपायची मिशीन घेऊन मंत्री आले चार ...

भानुक्काच्या एक्क्याने फुलवलेला मळा ...
येका दिसात मिशीन फिरवून चिरलान त्येचा गळा ...

मुहूर्ताचा नारळ फुटला डिजटल टिवी लावून ...
एक्क्याने आड जवळ केला सपाट माळ पावून ...

हा..हा.. म्हंता दिल्लीपतूर जाली बोंबाबोंब ...
लोकशाईला कवर करायला धावला चौथा स्तंब ...

भेट घेऊन साह्येब म्हन्ले,
“असं केलंत बाबांनो, तर कसा हूनार विकास ...
इलेक्सनपूर्वी केंद्रामद्ये स्मार्ट शिट्टी हुईल नापास ...”

म्या त्यांना येवढंच म्हन्लं,
“माज्यासकट एक्क्यालाबी येकच प्रस्न पडलाय ...
येवडया मोट्ट्या वादळाला तुमी शिट्टी काहून म्हनलाय ?
तुमी शिट्टी काहून म्हनलाय ?”

**विनिमय**
**(विनीत मुळे)**
तृतीयवर्ष (कला)

*तृतीय क्रमांक (विभागून) :*

## नवरस



भेटायला ती वेळेवर यायची,
तो उशिरा पोहोचायचा,
प्रत्येक लेटमार्कला
तो नवी कथा सांगायचा.

आजही नवी कथा होती, आजही तो उशिरा आला,
नजरानजर होताच तिचा राग नाहीसा झाला.

तिला तिच्याबद्दल एक कविता हवी होती,
तो देत नव्हता;
तिचं वर्णन तो शब्दात करू शकत नव्हता ...

त्याला त्याचं एक स्केच हवं होतं,
ती देत नव्हती;
त्याची पर्सनॅलिटी साध्या स्ट्रोक्समध्ये ती दाखवू शकत नव्हती ...

आज त्याने कविता आणली होती,
आज तिने  स्केच आणलं होतं;
त्याला काहीतरी विचारायचं होतं,
तिला काहीतरी सांगायचं होतं -

"माझ्यासोबत सात जन्म घालवायची तू शपथ घेशील ?"
"आसुसले होते; हा प्रश्न तू मला केव्हा विचारशील."

तो हसत उभा होता,
त्याला तिला डोळे भरून पाहावंसं वाटत होतं;
तीही हसत उभी होती,
तिला त्याला घट्ट मिठी मारावीशी वाटत होती ...

---

तो ऑफिसमधून घरी आला,
अभिनयाची झालर अंगावर होती;
त्याची बॅग तिने हातात घेतली,
आज ती थोडी निराश झाली होती.

‘आज हा असा का वागतोय ?
बहुतेक माझा वाढदिवस हा विसरला आहे.’
‘हिला माझं नाटक नाही समजलंय,
सरप्राईज अजून लांबवण्यात मजा आहे.’

“जेवण स्वतःच वाढून घे,” ती चिडून म्हणाली.
तो मनातल्या मनात हसला,
झोपायची वेळ झाली, अभिनय सुरूच होता;
तिचा चेहरा आता एवढुस्सा झाला.

“उशी जरा सरकव, अन्कम्फर्टेबल वाटतंय,”
हलकी स्माईल देत तो म्हणाला;
नाक उडवून लावून उशी नीट करताना
लहानशी वस्तू लागली तिच्या हाताला.

तो खोडकरपणे हसत होता,
ती अवाक होऊन पाहत राहिली;
तिला वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना
एक हिऱ्याची अंगठी त्याने बोटात सरकवली ...
-----------------------------------------------------------
टायची गाठ सुटलेली होती,
खोचलेला शर्ट अर्धा बाहेर होता,
त्याची जीभ जड झाली होती,
अडखळत तो चालत होता.
“असा का चालतोयस ? काही झालंय का तुला ?”
“एक गोष्ट बऱ्याच दिवसापासून त्रास देतेय मला.”

“तुझा त्रास कमी होईल; आपण एकत्र विचार करू.”

“कळत नाहीये मला, तुला हे सगळं कसं सांगू ?”

“ऑफिसच्या पार्टीला आली होतीस,
तेव्हा माझ्या बॉसने तुला पाहिलंय;
माझं प्रमोशन करून देण्यासाठी
त्याला तुझ्याकडून काहीतरी हवंय.”

तिला सगळं उमगलं होतं,
तो तरी कोड्यात बोलला होता;
'हा असा बोलूच कसा शकतो ?'
एवढाच विचार तिच्या मनात होता.

---------------------------------------------------------

"बॉसचं बोलणं ऐकूनच कसं घेतलंस ? बायको आहे मी तुझी !"
"त्याला काही बोललो असतो, तर नोकरी गेली असती माझी."

"बायकोपेक्षा आता नोकरी महत्त्वाची वाटतेय तुला ?!
प्रत्येक प्रसंगात साथ देईन, असं वचन दिलं होतंस ना मला."

"आज मदत कर मला, प्रमोशन होऊन जाईल;
गाडी असेल, टू-बी.एच.के. फ्लॅट असेल, आयुष्य होईल छान."
"डोकं ठिकाणावर आहे का तुझं ! मी अशी मदत कशी करू ?!
पैसा महत्त्वाचा असतो का स्वाभिमान ?"

---------------------------------------------------------

वातावरण तापत जात होतं,
त्याची चिडचिड वाढत होती;
तिचा मुद्दा बरोबर होता,
पण त्याला नोकरीही वाचवायची होती.
काय बोलू त्याला सुचेना,
त्याचा राग झाला अनावर;
ती ढसाढसा रडू लागली,
चार बोटं उमटली होती तिच्या गालावर.

---------------------------------------------------------

तिला तिच्याबद्दल एक कविता हवी होती,
त्याने लिहिली होती;
पण या कवितेला कागदावरील काही शब्दांशिवाय
आता काहीच किंमत नव्हती.

त्याला त्याचं स्केच हवं होतं
तिने काढलं होतं,
पण ते स्केच टांगलेल्या फोटोफ्रेमशिवाय
आता काहीच उरलं नव्हतं.

-------------------------          -------------------------------

तिला काहीतरी बोलायचं होतं,
काय बोलू कळत नव्हतं;
‘मी ज्याच्यावर प्रेम करायचे तो हाच का ?’
एवढंच तिच्या मनात होतं.



त्याला काहीतरी बोलायचं होतं,
कसं बोलू कळत नव्हतं;
‘कोणत्या तोंडाने आता हिच्यासमोर येऊ ?’
एवढंच त्याच्या मनात होतं.

तो ऑफिसला जाताना मोबाईल मुद्दाम विसरला,
किचनमधून तिने आठवण करून दिली;
मोबाईल घेतल्यावर तो दारात ‘बाय’ करायला थांबला,
किचनमधनं बाहेर ती फक्त दार बंद करायला आली.

दमलेल्या अवस्थेत तो घरात शिरला,
तिने ‘दिवस कसा गेला’ विचारलं;
फ्रेश होऊन, जेवून तो काहीच न बोलता झोपला,
ठरवलं असून आज तिचं ‘आय लव्ह यू’ म्हणायचं राहून गेलं ...

-----------------------------------------------------------

अनेक दिवस सरले; अबोला वाढत होता,
आजवर तिला कित्येकदा तो मनापासून ‘सॉरी’ म्हणाला होता.
एक दिवस अचानक :

‘‘तुझ्या सुखात नक्कीच माझं सुख आहे,
त्या प्रमोशनमधे तू तुझा आनंद पाहतोस,
ही शेवटची मदत मी तुला करायला तयार आहे.
यानंतर आधीसारखी वागेन, अपेक्षाही ठेवू नकोस.’’

तो आज अवाक् होऊन पाहत राहिला,
तिची वागणूक फारच बदलली होती;
एक गोष्ट त्याला टोचत राहिली की,
‘त्याची ती’ आज पूर्णपणे हरवली होती ...

**रोहित फाळके.**
द्वितीयवर्ष (कला)

## मंदिराच्या पायरीवर

मंदिराच्या पायरीवर एक माणूस बसला होता;
हताश, हतबल - त्याला कुणीच हात दिला नव्हता.

आता असंच आयुष्य त्याला पायरीवर काढायचं होतं,
देवासमोर बसून त्याला आता जगायचं होतं.

त्याला वाटलं, देव त्याच्यावर प्रसन्न होईल;
थोडा आपला प्रसाद त्याला खायला देईल !

रात्री तसाच झोपून राहिला, सकाळ झाली.
मंदिरातल्या पुजाऱ्याने त्याला हाकलून दिलं;
''देवासमोर 'घाण' नको,'' असं सांगून टाकलं.

पहिल्यांदा एक जोडपं आत गेलं,
मूर्तीला त्यांनी नारळ, कुंकू वाहिलं,
पिंडीवर देवाच्या दूधसुद्धा ओतलं ...

इथे ह्या माणसाचा जीव कासावीस झाला,
दुधाची नासाडी पाहून पेटून उठला;
बाहेर येताना त्या जोडप्यासमोर त्याने लोटांगण घातलं,
पण त्यांनीसुद्धा त्याला हाकलून दिलं ...

नंतर तर एक श्रीमंत शेठजी आत गेला,
पंचपक्वान्नांचा नैवैद्य घेताना पुजारीसुद्धा खूष झाला;
इथे ह्या माणसाच्या पोटात आग लागली होती,
पण काय करणार ? देवाच्या भक्तीपायी माणसं
माणुसकी विसरली होती ...

नंतर पुन्हा जोरजोरात आरती सुरू झाली;
आणि हा माणूस भुकेपायी रडू लागला !
रडता रडता झोप लागली, तो उठला संध्याकाळी;
समोर पडलेली एक शिळी भाकर दिसली,
आनंदाने त्याचा ऊर भरून आला !

भाकर तोडताक्षणी समोर एक लहान मुलगी आली,
पोटावर हात ठेवून खायला मागू लागली;
ह्याने चतकोर तोडून त्या मुलीच्या हातावर ठेवला,
ती मुलगीसुद्धा आनंदाने न्हाऊन गेली.

शेवटी काय ?
माणसाच्या माणुसकीपायीच माणूस वाचला;
हा प्रकार चालू असताना दगडाचा देवसुद्धा हळूच हसला ...

**मुकुल आव्हाड.**
प्रथमवर्ष (कला)

***उत्तेजनार्थ प्रथम क्रमांक***

## अनामिक

ओळखीचे चेहरे,
ती अनामिक एकटी.
विखुरलेले क्षण सारे,
अन् हरवलेली उत्तरे.

अनोळखीशा रानवाटा,
अन् करपलेल्या भावना.
सय तिची अंतरीची,
उरल्या विखारी वेदना.

धूसराचे भास सारे,
शल्य तिचे बोचरे.
आठवांचे डोह आणि
वास्तवाचे निखारे.

अंतरीचा खेळ चाले,
मार्ग नाही मोकळा.
कोरडया अश्रूंतुनी,
तिच्या मनातील वेदना.

जीव अंधारल्या राती,
स्वप्न कोमेजून गेले.
जवळी असून सारे,
ती एकलीच राहे ...



**सावनी गोगटे.**
प्रथमवर्ष (कला)

*उत्तेजनार्थ द्वितीय क्रमांक*

## जगुनी घे जरा

जन्माला आला आहेस,
थोडं जगून बघ !
जीवनात सुख, आनंद खूप आहे,
थोडं आजूबाजूला शोधून बघ !

छोट्याशा दुःखाने खाली कोसळू नकोस,
त्या दुःखाचे पर्वत चढून बघ !
यश आपल्याजवळ आहे,
त्या यशाची चव चाखून बघ !

कोणाशी नातं जुळवत असशील,
तर थोडा विश्वास ठेवून बघ !
जीवन जसं चाललंय तसं चालू दे,
त्यातील चढ-उतार ह्यांचा विचार करून बघ !

घरटं बांधणं खूप सोपं असतं,
थोडी मेहनत करून बघ !
लांब उभं राहून बघणं सोपं असतं,
जवळ येऊन खेळून बघ !

एकटं राहणं कठीण असतं, एकेकटं राहणं सोपं,
दोन्हीतल्या वेदना झेलून बघ !
जिणं-मरणं एक कोडं असतं,
लांब जाता जाता एवढं मात्र सोडवून बघ !

**हर्षल पांचाळ.**
तृतीयवर्ष (विज्ञान)

**कथा :**

मागील अंकात पावसाविषयीची एक कथा आपण वाचली. वेळेअभावी त्या अंकात समाविष्ट न करता आलेल्या पाऊसविषयक आणखी दोन कथा ह्या अंकात समाविष्ट करीत आहोत. येणाऱ्या पावसाचे सर्वच स्वागत करतात. जाणाऱ्या पावसाला आपल्या विद्यार्थ्यांकडून असलेला हा निरोपाचा सलाम !

## पाऊस

पावसाबद्दल सगळ्यांचीच वेगवेगळी मतं असतात, अगदी माझीही. शाळेत असताना पावसावर बरेच निबंध लिहिलेले. असा पडणारा, तसा पडणारा, सुखावणारा, दुखावणारा ... त्याचेही बरेच प्रकार. पण मी अनुभवलेला पाऊस वेगळाच, आणि हो, अविस्मरणीय सुद्धा ! छत्रीतूनही भिजवणारा पाऊस मला आवडायचा नाही, अजिबातच; पण तो मला अचानक आवडू लागला, हवाहवासा वाटू लागला; कारण तो पाऊस मला निषादची आठवण करुन द्यायचा.

मी केतकी. माझा जॉब, माझे आई-बाबा आणि खडूस बॉस ... नोकरीला लागल्यापासून आयुष्य जणू आकुंचन पावलेलं. काम, काम आणि काम. मला हेच कळलं नाहीये की, हे बॉस कंजूषच का असतात ? जर आपल्याला एखाद्या दिवशी लवकर निघायचं असेल, तर त्यांनी जास्तीची कामं नेमकी तेव्हाच द्यायला हवीत. बऱ्याच वेळा असं झालेलं. मला घरी लवकर जायचं असायचं, अन् नितीन सर (म्हणजे तोच खडूस बॉस) जास्तीची कामं द्यायचे. अर्थात, जर त्या दिवशी नितीन सरांनी जास्त कामं सांगितली नसती तर ... मला उशीर झाला नसता, मी वेगात गाडी चालवली नसती, अपघात झाला नसता आणि माझी निषादशी ओळखही झाली नसती !

लक्षात आहे माझ्या ती तारीख - २७ जून २०१५, वार शनिवार. आई-बाबांच्या लग्नाचा वाढदिवस होता, २८ जूनला. त्यासाठी तयारी करायची होती, म्हणून लवकर निघेन म्हणत होते; तेवढ्यात नितीन सरांनी खास त्यांच्या केबिनमध्ये बोलावून चार जास्त कामं दिली. मी संध्याकाळी पाच वाजता निघेन, असं अपेक्षित होतं; पण या कामांमुळे रात्रीचे आठ वाजले. माझं ऑफिस अंधेरीला आणि घर कांदिवलीला. आमची चारचाकी होती आणि मी आमच्या गाडीतूनच ये-जा करायचे. गर्दी खूप होती रस्त्यांवर, पण तरीही त्यातल्या त्यात लवकर पोहोचले. घर जवळ जवळ दहा मिनिटांवर आलेलं आणि तेवढ्यात ... मी एका बाईकला ठोकलं. मी सरळ रस्त्याने चाललेले, त्याच रस्त्याला डाव्या बाजूने एक गल्ली येऊन मिळते. ती बाईक त्याच गल्लीतून आलेली. मला आधीच उशीर झालेला, त्यामुळे मी गाडी बऱ्यापैकी वेगात चालवत होते. गल्लीतून गाडी येऊ शकते, तर आपण हॉर्न वाजवूया, असा विचार मी केलाच नाही; आणि त्या बाईकस्वारानेही तो केला नाही. आधीच उल्हास त्यात फाल्गुनमास अशी परिस्थिती झाली. त्यात आणखी भर म्हणजे, दिवसभर दडी मारून बसलेला पाऊस अचानक प्रकट झाला.

मी कुणाला तरी ठोकलंय हे कळल्यावर मला ज्या प्रकारे किंवा जेवढं ओरडायचं होतं तो आवाज घशातच अडकला; जेव्हा मी त्या मुलाला बरंच लागलंय हे बघितलं. हाताला बरंच खरचटलेलं आणि गुडघ्याला सुद्धा. मी झाल्या प्रकारामुळे घाबरले. क्षणभर काय करू, कळलंच नाही. पटकन सावध झाले आणि गाडी रस्त्याच्या बाजूला लावून छत्री घेऊन त्या मुलाला मदत करायला गेले. तरीही बरं म्हणायचं, जास्त माणसं जमा नाही झाली. मी त्याला उठवलं आणि हळूहळू त्याला गाडीत बसवलं. पाऊस अचानक सुरू झाल्यामुळे तो पूर्ण भिजलेला. मला बाईक चालवता नाही यायची, पण तरीही त्या मुलाची बाईक रस्त्याच्या बाजूला उभी केली आणि गडगडत लांब गेलेलं हेल्मेट घेऊन मी माझ्या गाडीजवळ गेले. पाऊस बराच होता, वाराही होता. हे सगळं होईपर्यंत माझी छत्री तीन वेळा उलटी झालेली.

मी त्या मुलाला विचारलं की, ''कुठे राहतोस ?'' खरं तर, चेहऱ्यावरून तो मोठा वाटत होता; पण माझ्यामुळे लागलेलं असल्याने मी चौकशी करत होते. चौकशी करतेय हे कुठेच गेलं; आणि त्या मुलाने माझ्यावर ओरडायला सुरुवात केली, "तुम्हाला कळत नाही का ? छोट्या रस्त्यावर गाडी कमी वेगात चालवावी, हे माहीत नाहीये का ?" ... टाळी जरी एका हाताने वाजत नसली; तरीही झालेल्या प्रकारात मोठी चूक माझी होती आणि जी मला मान्य होती. मी त्याला त्याचं नाव विचारलं आणि ते सांगायचं सोडून तो बाकीचंच बडबडत बसलेला. शेवटी मी त्याला जवळच्याच हॉस्पिटलमध्ये नेलं, तिथे जेव्हा कागदपत्रांवर लिहावं लागलं, तेव्हा मला त्याचं नाव कळलं – निषाद - निषाद पटवर्धन. डॉक्टरांनी त्याची जखम स्वच्छ केली आणि मलमपट्टी केली. मुका मारसुद्धा लागला होता होता म्हणून काही औषधंही लिहून दिली. मी हॉस्पिटलचे पैसे भरले आणि निषादला त्याच्या घरी सोडलं. त्याने मला जाता जाता नाव विचारलं. निषाद म्हणालेला की, पुढच्या मलमपट्ट्यांचं काय ते तोच बघेल; पण चूक माझी होती, म्हणून मी मलमपट्ट्या बदलण्यासाठी पुढील आठवडाभर निषादबरोबर हॉस्पिटलला जात राहिले. आम्ही जेव्हा जेव्हा भेटायचो, पाऊस पडायचाच, वातावरण वेगळंच असायचं. अपघातानंतर दोन आठवडे डॉक्टरांकडे जाण्याकरिता भेट होत राहिली. त्या दोन आठवड्यांत आमची एकमेकांशी चांगली ओळख झाली. आमच्यात मित्र-मैत्रिणीचं नातं तयार झालं. हळूहळू एकमेकांच्या मित्रमैत्रिणींशी ओळख वाढली, आमचा सातजणांचा गट तयार झाला. कॉलनीमध्ये रविवारी बुद्धिबळाचा डाव रंगायचा. कधीकधी शनिवार-रविवारी फिरायला जाणंही व्हायचं; पण मला जॉबमुळे जास्त वेळा जाता नाही यायचं.पावसाळ्यात फिरायची मजाच वेगळी, त्यातही मित्र-मैत्रिणींबरोबरची मजा तर काही विचारूच नका. मजा, मस्ती आणि धमाल ... पावसाळी सहलींना आम्ही एकत्र खूप मजा केली. जुलै महिन्यात खूप फिरले मी.

हळूहळू गाठीभेटी कमी झाल्या. प्रत्येकजण आपापल्या वेळापत्रकात गढून गेलेला असायचा. व्हॉट्सअप किंवा फेसबुकवर बोलणं व्हायचं. त्यावरूनच मला कळलेलं की, निषाद नोकरीसाठी मुलाखती देतोय. मी ज्या कंपनीत कामाला होते, त्याच कंपनीत अर्ज केलेला त्याने;

योगायोगाने जिथे माझी नुकतीच बदली झालेली तिथेच निषादलाही नोकरी मिळाली. सुरुवातीचे काही दिवस मला माहीतही नव्हतं की, निषाद माझ्याच शाखेत कामाला आहे. ना आमची ऑफिसमध्ये भेट झालेली, ना बोलणं झालेलं. जवळजवळ एका आठवड्याने मी निषादला ऑफिसमध्ये बघितलं, तेव्हापासून आम्ही एकत्र येऊ-जाऊ लागलो. त्याचदरम्यान एका रात्री खूप पाऊस पडला, काही ठिकाणी पाणी तुंबलेलं आणि अशावेळी चारचाकी नेणं योग्य नव्हतं. रेल्वेसेवाही कोलमडलेली, त्यामुळे निषादच्या दुचाकीवरून जायचं ठरलं. पाणी तुंबल्यामुळे वाहतूककोंडी झालेली; तरीही आम्ही वेळेत पोहोचलो. वेगळाच अनुभव होता तो. काही दिवसांनी मला असं जाणवायला लागलं की, माझ्यात आणि निषादमध्ये कदाचित मैत्रीच्या पलीकडे काहीतरी आहे; पण हे सांगायचं कोणाला, हा प्रश्न मला पडला; आणि आईने माझा हा प्रश्न अगदी सहज सोडवला. आई माझी आई कमी आणि मैत्रीण जास्त होती; आईमुळेच मला कळलं की, निषाद मला आवडू लागलाय. मनात धाकधूक होती, तरीही मी शांत राहायचं ठरवलं.


पुन्हा एकदा पाऊस आमच्या सोबतीला आला. त्या दिवशी मुसळधार पाऊस पडत होता. आमच्या गाडीतून जायचं ठरलं. ठरलेल्या वेळेनुसार निघालो. रस्त्यातच होतो, बाहेर धो धो पाऊस पडत होता नि गाडीत पावसाचीच गाणी ! काही वेगळंच वातावरण होतं ते ... त्या दिवशी का कुणास ठाऊक, पण आम्ही दोघंही काहीच बोललो नाही; पण आमची नजरानजर बऱ्याचवेळा झालेली. बऱ्याच वेळाच्या शांततेनंतर निषादनेच बोलायला सुरुवात केली, "केतकी, मला तुला काहीतरी सांगायचंय." त्याचं एवढं बोलून होत नाही, तोपर्यंत सिग्नल सुटला; त्यामुळे निषादच्या बोलण्यावरून गाडी चालवण्यावर मला माझं लक्ष वळवावं लागलं. त्यानंतर पुन्हा त्या दिवशी बोलणं पूर्ण झालंच नाही. कुठेतरी मला कल्पना आलेली की, जे मला सांगायचंय तेच कदाचित निषादलाही सांगायचं असेल ... पण आमच्यापैकी कोणीच बोलू शकत नव्हतं ! बरेच दिवस असे शांत राहण्यात गेले.

अखेरीस तो दिवस आलाच, त्या दिवसापर्यंत अगणित चुकामुकी झालेल्या आमच्या. पण त्या रविवारी निषादने मला भेटायला बोलावलं. मनात धाकधूकच होती, तरीही गेले भेटायला. आमच्याजवळच असलेल्या कॅफेमध्ये भेटलो. तिथेसुद्धा शांतताच. आधी कोणी बोलायचं ? आणि काय ? ह्यातच वेळ चाललेला. शेवटी मीच म्हटलं की, "ओलंचिंब करणारा, सगळीकडे चिखल करणारा, छत्रीतूनही भिजवणारा पाऊस मला आवडायला लागलाय." ह्या वाक्यानंतर मी शांत झाले. पुन्हा बराच वेळ शांततेत गेला. कदाचित शांतताच बरंच काही बोलून गेलेली. अचानक पावसाची मोठी सर आली. मी बोलून बराच वेळ झालेला अन् शेवटी निषादने म्हटलं, "आधी कंटाळवाणा वाटणारा जो पाऊस तुला आता हवाहवासा वाटतोय, तो मलाही तसाच आवडू लागलाय." निषादने पुढे विचारलं की, "केतकी, तुला माझ्याबरोबर या हव्याशा वाटणाऱ्या पावसात भिजायला आवडेल का ?" हे म्हणत निषाद उभा राहिला अन् त्याने एक हात माझ्यापुढे धरला. मी काही वेळ स्तब्धच झाले, पण लगेचच भानावर आले. स्वप्नात

असल्यासारखंच  वाटलं. जसं सिनेमात होतं, तसंच झालं काहीसं माझ्याबाबतीत. मी आणि निषाद हातात हात घेऊन कॅफेतून निघालो, पण घरी जायला नाही ! घरी तर जाणारच होतो, पण आधी त्या हव्याहव्याशा वाटणाऱ्या पावसात भिजायचं होतं. तो पाऊस नेहमीच्या पावसापेक्षा वेगळा होता, वारासुद्धा वेगळाच ... सगळं वातावरणच खूप छान वाटत होतं ! हवंहवंसं वाटत होतं !

जे आम्हाला एकमेकांशी बोलता येत नव्हतं ते ह्या पावसानेच आम्हाला सांगितलं; आणि ह्या पावसामुळेच मी आज ‘सौ.केतकी निषाद पटवर्धन’ आहे. आमचं वय जास्त नाही बदललंय, पण पाऊस मात्र नक्कीच बदललाय; कारण मला तो दरवर्षी वेगवेगळ्या आठवणी देतोय, आणि पुन्हा एकदा नव्याने त्या आठवणींच्या पावसात भिजायला पाऊसच मला भाग पाडतोय !

**कौमुदी काटदरे.**



# आणि त्या दिवशी पाऊस होता …

बाहेर हलका पाऊस सुरू होता. तो खिशातला रुमाल काढून आपलं कपाळ टिपत असताना एक माणूस कॉन्फरन्स-रूममध्ये आला. तो माणूस आत येताच रूममध्ये बसलेली इतर पाच माणसं उभी राहिलेली पाहून तोदेखील उभा राहिला. तो आलेला माणूस टेबलाच्या एका बाजूला ठेवलेल्या खुर्चीजवळ आला आणि त्याने बाकीच्यांना बसायची खूण केली. तो म्हणाला, "गुड मॉर्निंग ! आपल्या ऑर्गनायझेशनला गेल्या काही वर्षांमध्ये झालेल्या तोट्याबद्दल आपण जे गेले दोन दिवस डिस्कस करतोय, त्याचं आज कन्क्लूजन काढायचंय … सो, जस्ट फॉर द फॉर्मलिटी, मी सगळ्यांची ओळख करून देतो - श्रीनिधी राजाध्यक्ष, मॅनेजमेंट हेड -"

"गुड मॉर्निंग सर." एक काळ्या ब्लेजरमधली मुलगी गम चावत म्हणाली.

- "बलराम रानडे, द फॉर्मर युनियन रेप्रेझेंटेटिव्ह -"

एका भक्कम बांध्याच्या माणसाने फक्त नमस्कार केला.

- "धनंजय पवार, अवर बँकिंग पार्टनर -"

पाणी पीत असलेल्या माणसाने ग्लास खाली ठेवला; आणि एक स्माईल दिली.

- "आणि आमच्या पब्लिक शेअर होल्डर्सचे दोन रेप्रेझेंटेटिव्ह, माफ करा, ज्यांची नावं मी विसरलोय."

ती दोन माणसं आपली नावं सांगण्याचा प्रयत्न करत असतानाच तो डायरेक्टर पुन्हा बोलू लागला -

"'पर्जन्य फायनान्सेस' चे मि. इंद्र देशपांडे आज इथे आपल्यासोबत आहेत." तो माणूस रुमाल खिशात ठेवून हात मिळवण्यासाठी पुढे करण्याआधीच, तो डायरेक्टर त्याच्याकडे दुर्लक्ष करून खुर्चीत बसला नि म्हणाला -

"सो, श्रीनिधी, टेल अस द समरी."

"शुअर सर," श्रीनिधीने एक फाईल ओपन केली, "आपण आपल्या ऑर्गनायझेशनच्या स्थापनेपासूनच 'पर्जन्य फायनान्सेस' ह्यांच्यासोबत डील केलं होतं. द डील इस सिम्पल. आपण 'पर्जन्य' मॅनेज करत असलेल्या ॲग्रो-बेस्ड प्रोजेक्ट्समध्ये इन्व्हेस्ट करायचं, ज्याचे रिटर्न्स 'पर्जन्य' आपल्याला जून, जुलै ह्या दोन महिन्यांत देणार; बट गेल्या काही वर्षांपासून ते रिटर्न्स लेट येतायत." बलराम पुढे हलक्या चिडलेल्या सुरात म्हणाला, "आणि रिटर्न्स लेट येत असल्याने त्या महिन्यांसाठी आम्हाला कॅपिटल मार्केटमधून फंड्स उचलावे लागतात. 'पर्जन्य'च्या रिटर्न्सने आपली इन्व्हेस्टमेंट कशीबशी ॲट पार येते. पण या एक्स्ट्रा फंड्सचे आम्हाला लॉसेसच होतायत."

ह्या विधानावर इंद्रच्या तोंडून नुसता एक 'पण' निघताच सगळे एखाद्या आरोप्याकडे पाहावं तसं त्याच्याकडे पाहू लागले. तरीही त्याने आपले म्हणणे मांडले, "आमचे रिटर्न्स लेट येतात, हे मान्य; पण ह्यामागेसुद्धा काही कारण आहे. तुम्हीच आमचे क्लायंट नसून, इतर इंडस्ट्रीजसुद्धा आमचे क्लायंट्स आहेत. तिथे आमचे फंड्स लॉक होऊन बसलेले असतात. आम्ही आमचे लॉसेस फेस करूनही तुमचे रिटर्न्स पूर्ण देतो. आणि आम्ही आमच्या रिटर्न्सचा पीरियड एक्स्टेंड करतोच की."

"पण लेट रिटर्न्सचे तुम्ही काही कॉम्पेन्सेशन देत नाही," बलरामने आपला हात टेबलावर जोरात आपटला. श्रीनिधीने त्याच्याकडे टाकलेल्या कटाक्षाचा अर्थ समजून घेत तो शांत होत पुढे म्हणाला, "त्या एक्स्टेंडेड पीरियडचा आम्हाला अधिक लॉस होतो; कारण आम्हाला आमचा वेळ आधीच्या प्रोजेक्टवरच वाया घालवावा लागतो." हे ऐकून इंद्रला परत घाम सुटला.

"सो, आपण ह्या कॉंट्रॅक्टचं काय करू शकतो ?" कन्क्लूजन काढण्याच्या प्रयत्न करत डायरेक्टर म्हणाले. श्रीनिधी म्हणाली, "द इश्यू इज, आपण एक पब्लिक कंपनी आहोत; आणि लोक आपल्या सर्विसेसवर खूप अवलंबून आहेत. सो, या अॅट पार रिटर्न्सची कितीही नाही म्हटलं, तरी आपल्याला गरज आहे. पण आपण रिटर्न्स-पीरियड चेंज केला तर -" ह्यानंतर त्या सगळ्यांचं डिस्कशन सुरू राहिलं आणि आपल्या कंपनीची परिस्थिती समजून न घेता त्यांना स्वतःच्याचबद्दल विचार करताना पाहून इंद्र फक्त गप्पपणे ऐकत राहिला.

दोन तासांनी ती मीटिंग संपल्यावर तो त्या इमारतीतून बाहेर पडला. स्वार्थ कायम माणुसकीच्या आड येतो, हे जसं त्याच्या मनात खोल रुतत जात होतं, तसं मळभ अधिकच दाटून येत होतं. तो त्या इमारतीच्या पायरीवर पाणावलेल्या डोळ्यांनी बसला आणि त्याच्याच दुःखात जणू सामील होऊन ढगसुद्धा रडू लागले.

**रोहित फाळके.**
तृतीयवर्ष (कला)

# वाचू आनंदे

(ह्या सदराच्या माध्यमातून नव्या-जुन्या पुस्तकांची विद्यार्थ्यांनी लिहिलेली परीक्षणे मांडली जाणार आहेत. ह्या अंकात, २०१६-२०१७ ह्या शैक्षणिक वर्षातील तृतीयवर्ष कला शाखेच्या 'मराठी' विषयाच्या पाचव्या व सहाव्या सत्रांच्या परीक्षांत 'ओ' श्रेणी मिळवून उत्तीर्ण झालेल्या कविता गिते ह्या आपल्या माजी विद्यार्थिनीने रा. रं. बोराडे-लिखित 'पाचोळा' ह्या कादंबरीचे केलेले परीक्षण समाविष्ट करीत आहोत. कविताचे हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीकरिता तिला मनःपूर्वक शुभेच्छा !)

## बदल हेच एक शाश्वत सत्य

मानवाच्या उत्क्रांतीचा अभ्यास केला असता आपल्या लक्षात येते की, एकविसाव्या शतकात पोहोचलेला माणूस हा अनेक बदलांना सामोरा जात आपल्या जीवनात प्रगती घडवत पुढे आलेला आहे. हे बदल एका बाजूने माणसाच्या आयुष्यात जशी प्रगती घेऊन आले, त्याच प्रकारे ह्या बदलांशी जुळवून न घेऊ शकलेल्या माणसांची मात्र अधोगती घडवताना दिसले. अशाच एका माणसाची अधोगती रेखाटत लेखक रा. रं. बोराडे आपल्या समोर 'गंगाराम शिंपी' व त्याचे कुटुंब उभे करतात ते 'पाचोळा' ह्या कादंबरीतून.

'पाचोळा' ही कादंबरी १९७१च्या टप्प्यावर प्रकाशित झाली असून, मोजून ११० पृष्ठांची ही कादंबरी आहे. कादंबरीत प्रकरणे दिसत नाहीत, पण कथानकाचे विभाग पाडलेले दिसतात. कादंबरीतील प्रदेश हा लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील असल्याने पात्रांच्या तोंडीही तीच ग्रामीण बोली आलेली आहे; पण वाचकाला त्यामुळे कादंबरीचे आकलन होण्यात अडचण जाणवत नाही. ही बोलीभाषा वाचकाला कादंबरीच्या अवकाशाशी एकरूप होण्यास मदतच करते. ही समग्र कादंबरी पार्वती (गंगाराम शिंप्याची बायको) हिच्या आत्मनिवेदनातून उभी राहिलेली दिसते.

कादंबरीची सुरुवात, पार्वती आपल्या भूतकाळाची आठवण काढत , 'बरं चाललं व्हतं, कुनाचं एक न्हवतं का दोन न्हवतं' अशा प्रकारे करून बदलत गेलेल्या परिस्थितीचे दर्शन घडवताना दिसते. 'पाचोळा' ह्या कादंबरीचा नायक गंगाराम हा शिंपी असून, परंपरेतून आलेल्या ह्याच व्यवसायावर आपले कुटुंब पोसत असतो. परंतु गावगाड्यात अचानक घडलेल्या बदलाला तो सामोरे जाऊ शकत नाही. त्यामुळे निर्माण झालेली प्रतिकूल आर्थिक परिस्थिती व त्याहीपेक्षा 'आपण आता उपयोगाचे राहिलो नाही' ह्या विचाराने तो जास्त खंगत जातो; आणि आपल्याबरोबर कुटुंबाचीही फरफट करताना दिसतो. ह्या सर्वांचे चित्रण करणारी पार्वती त्याला ह्या सर्वांतून सावरू पाहते; पण गंगारामचा तापट स्वभाव त्याला ह्या परिस्थितीच्या फेऱ्यातून बाहेर पडू देत नाही. गंगाराम आणि पार्वतीच्या संसारातील महत्त्वाचे

घटक म्हणजे त्यांचा मुलगा भानू आणि मुलगी तानी. कुटुंबातील एका व्यक्तीचा त्रास म्हणजे सगळ्यांनाच त्याचे परिणाम भोगावे लागतात, ह्याचा अनुभव लेखक आपणांस भानूच्या चित्रणातून उत्तम प्रकारे करून देतात.

'व्यक्ती तितक्या प्रवृत्ती' ह्या नियमाने तापट गंगाराम, त्याचा स्वभाव समजून घेऊन संसार करणारी सोशिक पार्वती, तसाच आर्थिक सुबत्तेच्या अहंकाराखाली दबलेला गरड, ज्याच्या अहंकारातूनच ठिणगी पडते आणि शिंपी परिवार हा कसा विस्कळत जातो, हे लेखक आपल्यासमोर मांडतात. 'आधीचं तारं न् त्येत गेलं वारं', 'घूस शिरल्यावाणी झालंतं घराला इतं बीळ पडलं म्हणून बुजवायला जावं तर लगेच दुसरीकडं दुसरं बीळ' अशा अनेक म्हणी आणि वाक्ये पार्वतीच्या तोंडी लेखक योजितात; ज्यांतून 'पाचोळा' कादंबरीतील परिस्थिती प्रकर्षाने जाणवते. ज्या बदलांतून ह्या कुटुंबाचा संसार इतका विस्कळीत होतो, तो बदल म्हणजे औद्योगिकीकरण. ह्या औद्योगिकीकरणातून गंगारामच्या गावात शहराची हवा वाहायला लागते आणि त्यात गंगारामसारखी माणसे, त्यांची कुटुंबे ही वारा नेईल त्या दिशेने पाचोळ्यासारखी वाहत जातात, ह्या अर्थी 'पाचोळा' हे समर्पक शीर्षक लेखकाने योजिले आहे. 'पाचोळा' ह्या कादंबरीत ज्याप्रमाणे 'बदल' हे एक तत्त्व घेऊन लेखक वाचकांसमोर वास्तव उभे करतो. हे जसे कादंबरीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे, तसेच अजून एक वैशिष्ट्य म्हणजे, कादंबरीच्या शेवटी लेखक कादंबरीची निर्मितिप्रक्रिया उलगडून सांगतात. ह्यातून लेखकाची जीवनाकडे पाहण्याची दृष्टी समजते.

१९७१ च्या टप्प्यावर लेखक रा. रं. बोराडे ह्यांची 'पाचोळा' ही पहिलीच कादंबरी आपल्याला 'बदलाला सामोरे जाण्याची आवश्यकता' समजावून सांगते. आता एकविसाव्या शतकात तंत्रज्ञानात होणारे बदल आणि त्यामुळे माणसाच्या आयुष्यात झपाट्याने बदल होत आहेत व ते ह्यापुढेही घडत राहतील. ह्या वास्तवात जो समाजघटक 'बदल हेच एक शाश्वत सत्य' ही संकल्पना समजून घेऊ शकत नाही, तो कशा प्रकारे दुर्लक्षित राहतो व विस्कळीत होतो, ह्याचे भान वाचकाला लेखक १९७१च्या काळात घडवून देत आहेत; जे भान आजच्या काळालाही लागू होणारे आहे.

**कविता गिते**

**(माजी विद्यार्थिनी)**

**पाचोळा**

**रा. रं. बोराडे**

**मौज प्रकाशन**

**पृष्ठसंख्या - ११०, किंमत - रु. ७०.**

# तुम्हाला हे माहीत आहे का ?

(मराठी ही आपली निजभाषा, प्रिय भाषा आणि कित्येकदा ज्ञानभाषा, व्यवसायभाषा असली; तरी मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती ह्यांविषयी अनेक गोष्टी आपल्याला ठाऊक नसतात. त्या माहीत आहेत का, हे आपले आपल्याशी पडताळण्यासाठी एक छोटासा आरसा असे ह्या सदराचे स्वरूप आहे. ह्या सदरात विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे आम्हाला sahitau.marathi@ruparel.edu ह्या ई-पत्त्यावर अवश्य कळवा. अचूक उत्तरे पाठविणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे पुढील अंकात छापण्यात येतील. पहिल्या आणि दुसऱ्या अंकांतील प्रश्नांची योग्य उत्तरे पुढील अंकात छापण्यात येतील.)

१. मराठीतील पहिली कादंबरी कोणती ?

२. अव्वल इंग्रजी काळात मराठी भाषेच्या व्याकरणलेखनावर कोणत्या दोन भाषांच्या व्याकरणांचा प्रभाव होता ?

३. मराठीतील पहिले भाषांतरकार असो कुणाला संबोधिले जाते ? त्यांनी कोणत्या ग्रंथाचे भाषांतर केले ?

४. मराठीमध्ये नवीन शब्द कोणकोणत्या प्रकारे तयार होतात ?

५. वि. वा. शिरवाडकर कोणत्या टोपणनावाने काव्यलेखन करतात ?

संकलन - **ज्योत्स्ना भाटवडेकर.**
तृतीयवर्ष (कला)

# खेळातून मराठीकडे ...

(मराठीविषयीच्या भाषिक क्षमता वाढविण्याकरिता काही रंजक खेळ ह्या सदरात समाविष्ट करण्यात येतील. ह्या वेळी 'शब्दसमूहाकरिता एक शब्द सुचवा' हा खेळ देत आहोत. असे काही खेळ माहीत असल्यास किंवा बनविले असल्यास, त्यांविषयी 'सहितौ'ला अवश्य कळवावे.)

**शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा. -**

१. आपल्याच मताप्रमाणे चालणारा माणूस -

२. स्वतःशी केलेले भाषण -

३. वर्णन करण्यास अशक्य -

४. स्वतः कष्ट न करता दुसऱ्याने मिळविलेले बसून खाणारी व्यक्ती -

५. कोणत्याही स्थितीत जिची बुद्धी स्थिर राहते अशी व्यक्ती -

६. जन्मापासून मुबलक संपत्ती जवळ असणारा माणूस -

७. जिची दुसऱ्याशी तुलना करता येणार नाही अशी गोष्ट -

८. जिचे हात गुडघ्यापर्यंत पोहोचतात अशी व्यक्ती -

९. सर्व इच्छा पूर्ण करणारी गाय -

१०. कार्य करण्याची पात्रता असलेला माणूस -

संकलन- **तेजल भट्टे.**

तृतीयवर्ष (कला)

# शब्द शब्द जपुनी ठेव ...

(भाषासमृद्धीच्या दृष्टीने, मराठी भाषेतील शब्दसंपदा वाढवायला हवी, त्याबरोबर ती वापरायलाही हवी; ती वापरण्यासाठी ती माहीत व्हायला हवी. नेमक्या ह्याच भूमिकेतून प्रत्येक अंकात काही पारिभाषिक शब्दांचा परिचय करून देणार आहोत.)

१. Navigation - नौकाविहार

२. Synchronize - जुळविणे, समावृत्ती करणे

३. Up-to-date - अद्ययावत

४. Brittle - ठिसूळ

५. Wage - पगार, मोबदला

६. Gyro-compass - होकायंत्र

७. Radiation - उत्सर्जन

८. Bail - जमीन

९. Protein - प्रथिन

१०. Renewal - नूतनीकरण, नवीकरण

११. Texture - पोत

१२. Website - संकेतस्थळ

संकलन – **सानिका आठवले.**

तृतीयवर्ष (कला)

# थोडेसे चिवित्र




**- श्रद्धा कदम**

द्वितीयवर्ष (कला)

# मराठी वाङ्मय मंडळाचे उपक्रम : अहवाल

## कार्यक्रम पहिला :

## 'झगमगाटापलीकडचे जग'

शनिवार, दिनांक १९ ऑगस्ट २०१७ रोजी डी. जी. रुपारेल महाविद्यालयातील २०१७ -२०१८ या शैक्षणिक वर्षातील पहिला कार्यक्रम पार पडला. रुपारेल महाविद्यालयातील ७ (कला) या वर्गात विद्यार्थ्यांच्या प्रचंड उपस्थितीत हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. ह्या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यासाठी डी. जी. रुपारेल महाविद्यालयातील मराठी विभागाचे माजी विद्यार्थी आणि सुप्रसिद्ध दिग्दर्शक, नाटककार, पटकथालेखक आणि अभिनेता श्री. प्रियदर्शन जाधव हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या आरंभी मराठी-वाङ्मयमंडळाचा कार्यवाह आशुतोष रेवाळे ह्याने मराठी-वाङ्मयमंडळाच्या उपक्रमांसंबंधी माहिती दिली. रुपारेल महाविद्यालयात मराठी-वाङ्मयमंडळातर्फे दरवर्षी स्वरचित काव्यस्पर्धा आयोजित केली जाते. २०१६-२०१७ ह्या शैक्षणिक वर्षात आयोजित करण्यात आलेल्या काव्यस्पर्धेच्या विजेत्यांना उद्घाटनाच्या कार्यक्रमात प्रियदर्शन जाधव ह्यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. श्रावणी पाटील ह्या विद्यार्थिनीने प्रियदर्शन जाधव ह्यांच्या कला-कारकिर्दीसंबंधी तयार केलेली ध्वनिचित्रफीत ह्या प्रसंगी दाखविण्यात आली. ह्या कार्यक्रमात मराठी वाङ्मय मंडळातील विद्यार्थ्यांच्या 'सहितौ' ह्या नियतकालिकाच्या पहिल्या अंकाचे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रकाशन केले गेले आणि त्याची ई-आवृत्ती रुपारेल महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली.

'सहितौ'च्या प्रकाशनानंतर प्रमुख पाहुणे प्रियदर्शन जाधव ह्यांनी 'झगमगाटापलीकडचे जग' ह्या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. कलाकार म्हणून काम करत असताना त्यांना आलेले चांगले-वाईट अनुभव त्यांनी मांडले. 'दुरून डोंगर साजरे' ह्या म्हणीप्रमाणे वरवर दिसणाऱ्या प्रसिद्धीच्या वलयापाठी असलेली मेहनत, कष्ट ह्यांविषयी ते विद्यार्थ्यांशी बोलले; आणि स्पर्धेच्या जगात स्वतःला टिकवताना, प्रसिद्धी मिळवताना 'जगणं विसरता कामा नये', असेही ते म्हणाले. त्याचबरोबर रुपारेलच्या आठवणी, घडणीच्या काळातील त्यांचे अनुभव ह्यांविषयीदेखील ते भरभरून बोलले. प्रश्नोत्तरांनंतर पाहुण्यांना विद्यार्थ्यांनी आणलेल्या भेटवस्तू देऊन, सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. सावनी गोगटे ह्या विद्यार्थिनीने सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले आणि अमृता अरभावी ह्या विद्यार्थिनीने आभार प्रदर्शित केले.

रुपारेल महाविद्यालयाचे भूतपूर्व प्राचार्य डॉ. प्रदीप कुलकर्णी, महाविद्यालयाचे उप-प्राचार्य डॉ. दिलीप मस्के, उप-प्राचार्य डॉ. नीता ताटके, मराठी-विभागप्रमुख प्रा. वैशाली जावळेकर, मराठी विभागातील प्राध्यापक डॉ. अनघा मांडवकर, अन्य विभागांतील प्राध्यापक आणि विद्यार्थी ह्यांच्या उपस्थितीत सदर कार्यक्रम संपन्न झाला.

## कार्यक्रम दुसरा :

## 'कावळ्यांची शाळा' : अभिवाचन

गुरुवार दिनांक, १४ सप्टेंबर २०१७ रोजी डी. जी. रुपारेल महाविद्यालयातील २०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षातील मराठी वाङ्मय मंडळाचा दुसरा कार्यक्रम पार पडला. यंदाच्या प्रथमवर्ष कला शाखेच्या विद्यार्थ्यांनी हा कार्यक्रम सादर केला. त्यांच्या अभ्यासक्रमात समाविष्ट असलेल्या विजय तेंडुलकर-लिखित 'कावळ्यांची शाळा' ह्या नाटकाच्या अध्ययनास पूरक उपक्रम म्हणून विद्यार्थ्यांनी सदर नाटकाचे अभिवाचन सादर केले. हा कार्यक्रम महाविद्यालयातील २ (विज्ञान) ह्या वर्गात दुपारी १२ ते २ या वेळेत आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला विजय तेंडुलकर व 'कावळ्यांची शाळा' ह्यांबद्दल उपस्थितांना माहिती सांगण्यात आली व त्यानंतर अभिवाचनास सुरुवात झाली. ह्या कार्यक्रमास प्रेक्षकांचा भरघोस प्रतिसाद लाभला. अभिवाचनानंतर विद्यार्थ्यांनी ह्या नाटकाविषयीचे त्यांचे आकलन मांडले व शेवटी सर्वांचे आभार मानून या कार्यक्रमाची सांगता झाली. मराठी विभागप्रमुख प्रा. वैशाली जावळेकर ह्यांच्या हस्ते गुलाबपुष्प देऊन प्रथमवर्ष कला शाखेच्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यात आले. मराठी विभागातील प्राध्यापक डॉ. अनघा मांडवकर, रुपारेल महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागातील प्रा. प्राची फडके ह्यादेखील ह्या कार्यक्रमास उपस्थित होत्या.

संकलन - **अमृता अरुण.**

**आशुतोष रेवाळे.**

**सावनी गोगटे.**

उदास झालेलं माझं मन
इतकं प्रसन्न कसं झालं
साधं पाखरू तर बागेत
चिवचिवलं

\- शिरीष पै



जन्म : १५ नोव्हेंबर १९२९
मृत्यू : २ सप्टेंबर २०१७

**'सहितौ' नियतकालिकातर्फे शिरीष पै ह्यांना भावपूर्ण आदरांजली...**

The D. G. Ruparel College of Arts, Science and Commerce,
Senapati Bapat Marg, Mahim, Mumbai - 400 016.
visit us at : www.ruparel.edu